जिल्हा परिषद, जळगांव
सामान्य प्रशासन शाखा
विभाग-
संदर्भ क्र. ९१५
मिळाल्याचा दिनांक 26 JUL 2004
क्र.सा.
अधि./उप मु.का.अ. (ग्रा)

महाराष्ट्र शासन

क्रमांक : व्हीपीएम २६९९/प्रक्र १०७१/पंरा-४ (२२),
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १७ जुलै २००४.

ग्रामपंचायत विभाग
जिल्हा परिषद, जळगांव.
पत्र मिळाल्याचा दि. 28 JUL 2004
टेबल नं.
आवक नोंदवही क्र.
अधिक्षक
उप मु.का.अ. (ग्रा.पं.)

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हाधिकारी,

विषय :- महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४-ब मध्ये प्रसिध्द झालेल्या अधिसूचना.

---

मुंबई जिल्हा ग्रामपंचायत अर्थसंकल्प लेखा नियम १९५९ व मुंबई जिल्हा ग्राम विकास निधी नियम १९६० मध्ये सुधारणा

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब दिनांक ५ जून २००४ व दिनांक ११ जून २००४ च्या प्रत्येकी १० प्रती सोबत जोडल्या आहेत.

२. दिनांक ५ जून २००४ च्या शासन राजपत्रात अधिसूचना क्र. व्हीपीएम २६९९/सीआर १०७१(१) / पीआर ४ (२२) दिनांक ५ जून २००४ प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेन्वये मुंबई जिल्हा ग्राम पंचायत (अर्थसंकल्प व लेखा) नियम १९५९ च्या नियम ७ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्याची नोंद घेण्यात यावी. या सुधारणेनुसार आता जिल्हा ग्राम विकास निधीचे अंशदान ग्राम पंचायतीच्या सर्व स्त्रोतातील उत्पन्नाच्या फक्त ०.२५ असेल.

३. दिनांक ११ जून २००४ च्या शासन राजपत्रात अधिसूचना क्र. व्हीपीएम २६९९/सीआर १०७१(२) / पीआर -४ (२२) दिनांक ३ जून २००४ प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेन्वये मुंबई जिल्हा ग्राम विकास निधी १९६० च्या नियम ६(२) तसेच १२ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. ती प्रामुख्याने ग्राम पंचायतीनी यशवंत ग्राम

A/cr 1071 6

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, जळगांव.

Scanned with OKEN Scanner

समृध्दी योजनेसाठी जिल्हा ग्राम विकास निधीमधून बीनव्याजी व दिर्घ मुदतीची कर्जे घ्यावी यासाठीचा आहे.

४. वरील महत्वाच्या सुधारणांची आपल्या स्तरावरुन त्वरित नोंद घेण्यात येवून या सुधारणा आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व पंचायत समित्या व ग्राम पंचायती यांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात. तसेच सर्व संबंधित अधिका-यांनी या सुधारणेप्रमाणे तात्काळ अंमलबजावणी करण्याच्या सूचना द्याव्यात ही विनंती. तसेच या सुधारणांना व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती त्वरित शासनास कळविण्यात यावी.

( कुंदा गोसावी )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीसाठी अग्रेषित:

१) मा. राज्यपालांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्र्याचे सचिव,
३) मा. मंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
४) मा. राज्यमंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
५) मा. प्र.सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग ), मंत्रालय
६) कक्ष अधिकारी, का.क्र. पंरा-६ यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

Scanned with OKEN Scanner